**लोकमत**

# पर्पल फेस्तचे ॲम्बेसेडर म्हणून प्रसाद, राधेश, विशांत यांची नियुक्ती

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**पणजी:** जानेवारीत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पर्पल फेस्टसाठी प्रसाद जोशी, राधेश वर्दी आणि विशांत नागवेकर यांची पर्पल ॲम्बेसिडर म्हणून निवड करण्यात आली आहे. कर्णबधीर दिव्यांगत्व, हिमोफिलिया दिव्यांगत्व आणि अस्थी दिव्यांगत्व याचे अनुक्रमे प्रतिनिधित्व प्रसाद जोशी, राधेश वर्दी आणि विशांत नागवेकर करणार आहेत.



प्रसाद जोशी



राधेश वर्दी

जोशी हे इंडिया डेफ आर्ट्स अँड कल्चर सोसायटीचे उपाध्यक्ष म्हणून काम करतात. ते शाळांमध्ये भारतीय सांकेतिक भाषेचा समावेश करण्यासाठी जनजागृती करत आहेत तसेच त्यांना राज्य सरकारच्या समाजकल्याण विभागाकडून 'दिव्यांग श्रेणीतील सर्वोत्कृष्ट सरकारी कर्मचारी' हा पुरस्कारही प्राप्त झालेला आहे. पर्पल फेस्टच्या माध्यमातून भारतीय सांकेतिक भाषा ही भारताची २३वी अधिकृत भाषा म्हणून मान्यता मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा जोशी यांनी यावेळी व्यक्त केली.



विशांत नागवेकर

जन्मापासून हिमोफिलिया हा रक्तविकार असलेले राधेश वीं यांनी नेरुलमध्ये पद्मा प्रिंटर्सची स्थापना केली, हिमोफिलिया दिव्यांग जनांच्या सबलीकरणासाठी काम करणाऱ्या पणजीतील विशांत नागवेकर हिमोफिलिया सोसायटीच्या उपक्रमांमध्ये ते सक्रियपणे समर्थन देतात.

८९ टक्के अस्थी दिव्यांगत्व असलेले विशांत नागवेकर हे वन विभागामध्ये काम करतात. तसेच गोवा राज्य दिव्यांगजन आयुक्त कार्यालयाच्या सल्लागार समितीचे ते सक्रिय सदस्य आहेत. अनेक वर्षांपासून दिव्यांगांच्या विविध समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.